दैनिक
अदिती एक्सप्रेस

दि. १६ जानेवारी २०२६
शुक्रवार
वर्ष ४ थे
अंक ७९
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

आजचे पंचाग

- दिनांक : १६ जानेवारी २०२६
- वार : शुक्रवार
- माह (अमावस्यांत) : पौष
- माह (पूर्णिमांत) : माघ
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : द्वादशी तिथी (रात्री ०८:१६ पर्यंत) त्यानंतर त्रयोदशी तिथी
- नक्षत्र : ज्येष्ठा नक्षत्र (१६ जानेवारी पहाटे ०५:४७ पर्यंत) त्यानंतर मूळ नक्षत्र
- योग : वृद्धि योग (रात्री ०८:३७ पर्यंत) त्यानंतर ध्रुव योग
- करण : तैतुला करण (रात्री ०८:१६ पर्यंत) त्यानंतर गराजा करण
- चंद्र राशी : वृश्चिक राशी (१६ जानेवारी पहाटे ०५:४७ पर्यंत) त्यानंतर धनु राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : दुपारी ०२:११ ते दुपारी ०३:३४ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:२६ ते दुपारी ०१:१०
- सूर्योदय : सकाळी ०७:१६
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:२०
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

हवं तर ऑईल पेंट वापरा, पण विनाकारण...

शाईच्या वादावर फडणवीसांचा राज ठाकरेंना खोचक टोला



मुंबई : देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांसाठी सकाळी साडेसात वाजल्यापासून मतदान सुरू आहे. मुंबईत सकाळी ११.३० वाजेपर्यंत १७.७३ टक्के मतदान झाले आहे. दाट लोकवस्तीच्या भागात मतदारांचा उत्साह दिसून येत असतानाच, दक्षिण मुंबई आणि उपनगरातील उच्चभ्रू वस्त्यांमध्ये मतदानाची टक्केवारी अपेक्षेपेक्षा कमी नोंदवली गेली आहे.

मतदानादरम्यान काही राजकीय नेत्यांनी आणि विरोधकांनी 'मतदानाची शाई पुसली जात आहे' असा गंभीर आरोप केला होता. मात्र, निवडणूक प्रशासनाने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. बीएमसी प्रशासनाकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मतदानानंतर बोटावरील शाई पुसली जात असल्याबाबत महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी कोणत्याही प्रकारचे विधान अथवा वक्तव्य केलेले नाही. माध्यमांमध्ये प्रसारित होणारे वृत्त हे निराधार असून त्यात कोणतेही तथ्य नाही. प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा कोणत्याही अफवांना बळी न पडता निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये मतदान केले. मतदानानंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. याप्रसंगी काही पत्रकारांनी विरोधकांच्या शाई पुसली जात असल्याच्या आरोपाचा उल्लेख केला. यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी कडक शब्दांत भाष्य केले. निवडणूक निःपक्षपाती व्हायला हवी, पण प्रत्येक गोष्टीवर आरडाओरडा करून संशय निर्माण करणे चुकीचे आहे, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना सुनावले. स्वतःच्या बोटावरील शाई दाखवत मुख्यमंत्री म्हणाले की, बघा, माझ्याही बोटाला शाई लावली आहे, ती पुसली जातेय का? विनाकारण प्रत्येक गोष्टीचा बाऊ करणे योग्य नाही. जर कोणाला शाईबद्दल शंका असेल, तर निवडणूक आयोगाने त्याकडे लक्ष द्यावे. त्यांना वाटल्यास त्यांनी ऑईल पेंटचा वापर करावा, पण निवडणुका पारदर्शक व्हाव्यात यात दुमत नाही. विरोधकांकडून सातत्याने होत असलेल्या आरोपांवर निशाणा साधताना फडणवीस पुढे म्हणाले की, निवडणुकीच्या प्रक्रियेत पारदर्शकता हवीच, परंतु केवळ गोंधळ घालण्यासाठी आणि लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी प्रश्न उपस्थित करणे अत्यंत चुकीचे आहे. निवडणूक आयोगाने या तक्रारींची दखल घेऊन योग्य ती पडताळणी करावी, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मलबार हिल, वांद्रे (पश्चिम), जुहू आणि कुलाबा यांसारख्या उच्चभ्रू भागांत मतदानाची गती अतिशय संथ आहे. सुट्टीचा आनंद घेण्याकडे **(पान २ वर)**

१५,९०८ उमेदवारांचे राजकीय भवितव्य 'ईव्हीएम'मध्ये बंद



मुंबई/पुणे : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या २,८६९ जागांसाठी आज मतदानाचा धुरळा उडाला असून एकूण १५,९०८ उमेदवारांचे राजकीय भवितव्य आता ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. उद्या(१६ जानेवारी) सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होणार असून संपूर्ण राज्याचे लक्ष निकालाकडे लागले.

राज्यभरातील अनेक मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीन बंद पडल्याच्या देखील घटना घडल्या. त्यामुळे ज्या ठिकाणी मतदानाला उशिरा सुरुवात झाली, त्या ठिकाणी मतदानाची वेळ वाढवून देण्यात आली आहे. दरम्यान, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मतदानाच्या प्रक्रियेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मतदारांच्या बोटावर लावली जाणारी शाई (इन्क) सहजासहजी पुसली जात असल्याचा दावा राज ठाकरेंनी केला आहे. शाई जर पुसली जात असेल, तर पारदर्शक मतदानावर प्रश्नचिन्ह उभे राहते असे म्हणत त्यांनी यावर आक्षेप घेतला.

राज ठाकरेंच्या दाव्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने तात्काळ भूमिका स्पष्ट केली आहे. मतदानासाठी वापरली जाणारी शाई ही गुणवत्तापूर्ण असून ती सहजासहजी निघणारी नाही. नागरिकांनी शाईबाबत कोणताही संभ्रम मनात ठेवू नये किंवा अफवा पसरवू नयेत असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे.

शाई पुसून पुन्हा मतदान करणे शक्य नाही

मुंबई : महापालिका निवडणुकीत एकदा मतदान केल्यानंतर बोटावरची शाई पुसून पुन्हा मतदान केले जात असल्याच्या आरोपांनी सोशल मीडियावर धुमाकुळ घातला आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी यासाठी निवडणूक आयोगाला जबाबदार धरत संशय व्यक्त केल्याने राज्य निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिले आहे.

मतदान केल्यानंतर शाई पुसून पुन्हा मतदान करणे शक्य नसल्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले. वाघमारे म्हणाले, बोटावर लावण्यात आलेली शाई पुसण्याचा प्रयत्न करून मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, हे गैरकृत्य आहे. त्याचबरोबर बोटावरची शाई पुसून एखादी व्यक्ती पुन्हा मतदान करण्यासाठी आल्याचे आढळल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल. बोटावरची शाई पुसून कोणी गैरकृत्य करण्याचा प्रयत्न केला तरी संबंधित मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही, याबाबतची दक्षता यापूर्वीच घेण्यात आली आहे. मतदाराने मतदान केल्यानंतर त्याबाबत नोंद घेण्यात आलेली असते. त्यामुळे केवळ शाई पुसून गैरकृत्य केलेल्या मतदाराला पुन्हा मतदान करता येत नाही. याबाबत सतर्कता बाळगण्याच्या **(पान २ वर)**

राज्यात मतदानाच्या दिवशी जोरदार राडा

मुंबई : प्रतिनिधी- राज्यात मुंबईसह २९ महापालिकांसाठी आज सकाळी ७.३० पासून मतदान सुरू झाले. सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदानासाठी गर्दी झाली आहे. परंतु लोकशाहीच्या या उत्सवाला अनेक ठिकाणी गालबोट लागण्याच्या घटना घडल्या आहेत. काही ठिकाणी पैसे वाटपावरून राडा झाल्याचे दिसत आहे. त्यातल्या त्यात मतदान केल्यानंतर बोटावरील शाई पुसली जात असल्याचे प्रकार समोर येऊ लागले. यामुळे विरोधकांकडून राज्य निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारावर टीकेची झोड उठवली जात आहे. बोटावरील शाई पुसली जात असल्याचा प्रकार मुंबईपासून पुण्यापर्यंत सर्वत्र होताना दिसत आहे.

जळगाव शहरातील आर. आर. विद्यालय येथील मतदान केंद्रावर बोगस मतदानाच्या आरोपामुळे आज गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रभाग क्रमांक पाचमध्ये अपक्ष उमेदवार ॲड. पीयूष पाटील आणि शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख, माजी महापौर विष्णू भंगाळे यांच्यात थेट लढत सुरू आहे. सकाळपासून संशयास्पद मतदार आल्याचा आरोप करत ॲड. पीयूष पाटील यांनी निवडणूक अधिका-यांकडे तक्रार केली.

त्यानुसार ४० ते ४५ मतदारांकडून ओळखपत्र आणि आवश्यक पुरावे मागवण्यात आले. मात्र, ते सादर न होऊ शकल्याने संबंधितांना मतदान करू देण्यात आले नाही. या प्रभागात सुमारे तीन हजारांहून अधिक बोगस आणि दुबार मतदार असल्याची तक्रार आपण यापूर्वीही केल्याचा दावा पाटील यांनी केला. या प्रकाराची प्रशासनाने गंभीर दखल घेऊन योग्य खबरदारी घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली असून या सर्व घडामोडींमुळे आर. आर. विद्यालयातील मतदान केंद्रावर काही काळ तणावपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.

अकोल्यात मतदान केंद्रावर वादाचे रूपांतर हाणामारीत

अकोल्यातल्या एका मतदान केंद्रावर उमेदवारांच्या प्रतिनिधींमध्ये **(पान २ वर)**

नाशिक-तिरुपती अवघ्या १२ तासांत

नाशिक : प्रतिनिधी- नाशिकमध्ये २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. रिंग रोडचे काम पूर्ण झाल्यानंतर तिरुपतीला अवघ्या १२ तासांत जाता येणार आहे. नाशिक ते तिरुपती अंतर १३०० किलोमीटर आहे. नाशिक-सोलापूर-हैदराबाद- कुरनूल-कडप्पा-तिरुपती असा मार्ग असणार आहे. या प्रवासासाठी २० ते २२ तास लागतात. आता नाशिक ते अक्कलकोट अशा मार्गाला मंजुरी दिली आहे. यामुळे प्रवासाचे अंतर २०१ किलोमीटरने कमी होणार आहे. यामुळे प्रवासाचा कालावधी ४५ टक्क्यांनी कमी होईल.



कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील अंतर्गत आणि बाहेरील वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी रिंग रोड तयार करण्यात येणार आहे. नाशिक शहरात येणा-या आणि बाहेर जाणा-या प्रवाशांना वाहतूक कोंडीचा सामना करायला लागू नये, यासाठी हा प्रकल्प असणार आहे. आता नाशिक शहरातून जाणारे सर्व महामार्ग, नाशिक सोलापूर-अक्कलकोट महामार्ग या रिंग रोडला जोडला जाणार आहे.

नाशिकमधून आणि आजूबाजूच्या सर्व महामार्गांना जोडण्यासाठी रिंग रोड हा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. यामुळे आता तुम्ही अवघ्या १२ तासांत तिरुपतीला पोहचणार आहात, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितले होते.

नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. यासाठी लाखो भाविकांची गर्दी होईल. त्यादृष्टीने हा रिंग रोड खूप महत्त्वाचा आहे. सध्या नाशिकमध्ये धार्मिक, औद्योगिक आणि पर्यटनाचे केंद्र असल्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या कुंभमेळ्यात पाच ते सात कोटी भाविक येणार असल्याचा अंदाज आहे. **(पान २ वर)**

निवडणूक शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी विविध पथके गठीत : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



लातूर, : राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजी लातूर जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, उदगीर, जळकोट, निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी या १० पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणुकीची अधिसूचना १६ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध होणार असून ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होईल. तसेच ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया शांततेत व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी आवश्यक पथके स्थापन करण्यात आली आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांच्यासह विविध प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून म्हणजेच १६ **(पान २ वर)**

शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी



मुंबई : प्रतिनिधी- शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. शेतकऱ्यांना पुढच्या महिन्यात म्हणजेच फेब्रुवारीमध्ये २००० रुपये मिळणार आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जाणार आहेत. केंद्र सरकारसह राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी अनेक योजन सुरू केल्या आहेत. यामध्ये आता योजनेचा हप्ता फेब्रुवारीमध्ये दिला असल्याचे समोर आले आहे.

केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी पीएम किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेत वर्षभरात ६००० रुपये दिले जातात. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारनेही नमो शेतकरी योजना सुरू केली आहे. या योजनेतदेखील शेतकऱ्यांना वर्षाला ६००० रुपये दिले जातात. या योजनेत प्रत्येकी २००० रुपये असे तीन हप्ते दिले जातात. या योजनेत आता शेतकऱ्यांना नमो शेतकरी योजनेचा हप्ता पुढच्या महिन्यात मिळणार आहे.

राज्यातील ९१ लाख ९७ हजार शेतकरी या योजनेचा लाभ घेतात. या योजनेच्या पुढील हप्त्यासाठी कृषी विभागाने वित्त विभागाकडे १ हजार ९३० कोटी रुपयांचा निधी मागितला आहे. हा निधी मंजूर झाल्यानंतर **(पान २ वर)**

३५९ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद





लातूर, दि. १५ - महापालिकेच्या १८ प्रभागांतील ७० जागांसाठी गुरुवारी ३७५ मतदान केंद्रावर शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. मतदानाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रात्री उशिरापर्यंत मतदारांनी रांगा लावून आपला मतदानाचा हक्क बजावला. ३५९ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. उद्या (शुक्रवारी) बार्शी रोडवरील शासकीय महिला तंत्रनिकेतन विद्यालयात मतमोजणी होणार आहे. मतदार राजा महापालिकेतील सत्तेची चावी कोणाकडे देणार आणि महापालिकेवर कोणाचा झेंडा फडकणार, याकडे संपूर्ण लातूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

लातूर महापालिका निवडणुकीसाठी ७० जागांसाठी ३५९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. शहरातील १८ प्रभागांपैकी एक ते १६ मधून ४ नगरसेवक तर १७ व १८ मधून ३ नगरसेवक निवडून द्यावयाचे आहेत. शहरातील एकूण ३७५ मतदान केंद्रांवर गुरुवारी मतदान झाले. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी महापालिकेच्यावतीने स्विप पथकांच्यावतीने मतदार जनजागृती करण्यात आली. शहरात ३ सखी मतदान केंद्र, ६ आदर्श मतदान केंद्र तर २ पर्यावरणपूरक मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली होती. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी व्हील चेअर व रॅम्पची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

सकाळच्या वेळी उन्हाचा कडाका कमी असल्याने अनेक मतदान केंद्रांवर नागरिकांच्या रांगा पाहायला मिळाल्या. विशेषतः **(पान २ वर)**

मेंदूत केमिकल लोचा अन् हातावर...'रडके' म्हणत आशिष शेलारांनी ठाकरे बंधूना काढला चिमटा



मुंबई : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज उत्साहात मतदान पार पडत असतानाच, शाईच्या मुद्द्यावरून मोठे राजकीय युद्ध पेटले आहे. शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मतदानाच्या शाईच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यानंतर, भारतीय जनता पक्षाने त्यावर कडाडून टीका केली आहे. भाजप नेते आशिष शेलार यांनी ठाकरेंच्या आरोपांचा समाचार घेताना अत्यंत बोचरी टीका केली आहे. मतदानाची प्रक्रिया सुरू असताना उद्धव ठाकरे यांनी आरोप केला की, मतदारांच्या बोटाला लावली जाणारी शाई सहजपणे पुसली जात आहे. हा प्रकार लोकशाहीच्या प्रक्रियेत संशयास्पद असून प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. मात्र, ठाकरे यांच्या या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आणि शाईच्या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले.

आशिष शेलारांचे चोख प्रत्युत्तर

उद्धव ठाकरेंच्या या भूमिकेवर भाजपचे नेते आशिष शेलार यांनी जोरदार हल्लाबोल केला. ठाकरे बंधू हे नेहमीच 'रडके' राहिले आहेत. प्रत्येक वेळी निवडणुकीत पराभव समोर दिसू लागला की, असे रडगाणे गाणे आणि नवीन नाटक सुरू करणे ही त्यांची जुनी पद्धत आहे, अशा शब्दांत शेलारांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. शाईचा मुद्दा हा केवळ लोकांची दिशाभूल करण्यासाठी उकरून काढलेला असून त्यात कोणतेही तथ्य नसल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला. दुसरीकडे, प्रशासनाने आणि निवडणूक आयोगाने अशा प्रकारचे सर्व आरोप यापूर्वीच फेटाळले असून, बोटावरील शाई पुसल्याच्या वृत्तात कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट केले आहे. शाई पुसली तरी मतदाराची नोंद आधीच झालेली असल्याने दुबार मतदान शक्य नाही, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शेलार यांनी व्यक्त केला संशय

मतदानाची शाई पुसली जात असल्याच्या दाव्यावर शेलार यांनी संशय व्यक्त केला आहे. ज्याने कुणी शाई **(पान २ वर)**

इराणमधील खोमेनी यांच्या सत्तेला सुरुंग

इराणमधील खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेला नागरिकांचा उद्रेक थांबायचे नाव घेत नाही. इराणमध्ये खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून जनतेचे मोठे आंदोलन चालू असून या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले आहे. या हिंसक आंदोलनात आतापर्यंत ५४४ जणांचा बळी गेला असून १० हजाराहून अधिक आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. हजारो आंदोलकांना अटक व ५४ आंदोलकांचा बळी जाऊनही इराणी नागरिक खोमेनी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतच आहेत. खोमेनी सरकार हे आंदोलन चिरडण्याचा सर्वो तोपरी प्रयत्न करीत आहे मात्र आंदोलक कोणत्याही परिस्थितीत आंदोलन थांबवण्याच्या मानसिकतेत नाही. तेथील परिस्थिती हाताबाहेर गेल्याने भारतानेही इराणमधील आपल्या नागरिकांना लवकरात लवकर इराण सोडण्याचे आव्हान केले आहे. खोमेनी सरकार उलथवून टाकायचेच अशा मानसिकतेत आंदोलक असल्याने हे आंदोलन आणखी भडकण्याची शक्यता आहे. इराणमधील या आंदोलनाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. या आंदोलनाला अमेरिकेची फूस असल्याची चर्चा जागतिक माध्यमात आहे. चीन, रशिया या देशांनी तर तसा थेट आरोपच केला आहे. अर्थात हा आरोप चुकीचा आहे असे कोणीही म्हणणार नाही. डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यापासून इराणवर त्यांची वक्रदृष्टी होतीच. इस्राईल – इराण युद्धात ही अमेरिकेने इराण विरोधात भूमिका घेतली होती. इराणमधील खोमेनी सरकार उलथवून टाकणार असे ते कायम म्हणत आले आहेत. इराणमधील खोमेनी सरकार मानव अधिकारांचे उल्लंघन करीत असल्याने इराणवर अमेरिका हल्लाही करू शकते असा सज्जड दमही ट्रम्प यांनी इराणला दिला होता त्यामुळे इराणमधील या आंदोलनाला हवा देऊन खोमेनी यांचा परस्पर काटा काढण्याचा ट्रम्प यांचा डाव असू शकतो. व्हेनेझुएला प्रमाणे इराणमधील तेलसाठ्यावर देखील ट्रम्प यांची नजर आहे. खोमेनी अमेरिकेला ते सहजासहजी ते मिळवू देणार नाही म्हणून ते या आंदोलनाला धगधगत ठेवून खोमेनी यांचा काटा काढत आहे हे सत्य आहे. अमेरिका या आंदोलनाला पेटवत आहे हे जरी खरे असले तरी या आंदोलनाला खोमेनी हे स्वतःही तितकेच जबाबदार आहेत. रियाल हे इराणचे चलन आहे. रियालचे गेल्या काही वर्षात प्रचंड अवमुल्यन झाले आहे. १ लाख ४० हजार रियाल म्हणजे १ डॉलर अशी रियालची अवस्था झाली आहे. त्यामुळे येथील नागरिक भयचित झाले आहे. रियालचे अवमुल्यन झाल्याने तेथे महागाईचा कडेलोट झाला आहे. अन्नधान्य, औषधे आणि जीवनावश्यक वस्तू खरेदी करणेही नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. रियालचे अवमुल्यन होऊन महागाई प्रचंड वाढली, जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे देखील आवाक्याबाहेर गेल्याने नागरिक रस्त्यावर उतरले. वास्तविक या आंदोलनाची सुरुवात मागील महिन्यातच झाली होती. नागरिक रस्त्यावर उतरत असतानाही महागाई कमी करण्यासाठी आणि रियालचे अवमुल्यन रोखण्यासाठी खोमेनी यांनी कोणतेही पावले उचलली नाही त्याचा फटका त्यांना बसला. मागील महिन्यात तेहरान या इराणच्या राजधानीत सुरू झालेले हे आंदोलन आता इराणच्या ३३ प्रांतात पसरले आहे. हे आंदोलन आणखी वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे आणखी या आंदोलनात आणखी काही आंदोलनाचा जीव जाऊ शकतो. कदाचित हे आंदोलन खोमेनी यांचे सरकार उलथवूनही टाकेल. या आंदोलनाचा शेवट काय होईल हे येणारा काळच ठरवेल एकमात्र नक्की की या आंदोलनाने अनेक दशके सुरू असलेल्या खोमेनी यांच्या इराणमधील सत्तेला सुरुंग लागला आहे.

यशाचे शिखर पादाक्रांत करणाऱ्या तरुणाची प्रेरणादायी कहाणी : वावटळ

'वावटळ' ही संभाजी सरवदे यांची तरुणाईला भुरळ घालणारी कादंबरी आहे. अनेक माणसे अपयशाने खचून जातात. प्रसंगी आत्महत्या सारखा मार्ग निवडतात. जीवनाच्या प्रवासात अडथळ्यांचा सामना करताना मार्ग काढण्याऐवजी स्वतःला संपवण्याचा मार्ग त्यांना जवळचा वाटतो. पण हा मार्ग ज्यांनी निवडलेला असतो तो स्वतः साठीही चांगला नसतो. याची जाणीव त्यांना का होत नाही ?असा प्रश्न अनेकांना पडतो. असाच प्रश्न सरवदे यांनाही पडला म्हणून त्यांनी कादंबरीत त्या आशयाला घेऊन चालणारा सुरेश नावाचा नायक आदर्श भूमिकेतून साकारला. सुरेशच्या जीवनात संकट वावटळीसारखी येतात. त्या वावटळीत गुरफटून जाणे हा जरी निसर्ग नियम असला तरी त्यातून सही सलामत बाहेर पण पडता येते याचा आदर्श सुरेशच्या भूमिकेतून सरवदे यांनी समाजाला घालून दिला.

तसे पाहिले तर संघर्ष हा सर्वांच्याच पाचवीला पूजलेलाच असतो. ते जीवन सरवदे यांनी जवळून पाहिले, जगले व जगत आहेत.धडपड करणे हा त्यांचा स्वभाव असल्यामुळे त्यांनी उभा केलेला नायक हाही धडपड करतो. तो हार मानत नाही. प्रसंगी तो खचलेला दिसेल. पण राखेतून पुन्हा जिवंत झालेल्या फिनिक्स पक्षाप्रमाणे उभारी घेतो. उंच भरारी घेतो. नवे स्वप्न, नवे जग निर्माण करतो. सरवदे यांनी आत्महत्या करण्याचा विचार करणाऱ्यांच्या डोळ्यात या कथानकातून झणझणीत अंजन घातले आहे. आपल्या मागे आपल्यासाठी जगणारे,आपल्यावर आधारित असणारे, आपल्यावर प्रेम करणारे अनेक जण आहेत याची जाणीव त्यांनी करून दिली.ही जाणीव अनेकांना जगण्याचे बळ देणारी आहे. आत्महत्येपासून परावर्त करणारी आहे.

साहित्याने साहित्य निर्मितीनंतर काहीतरी साध्य करायला हवं. भलेही त्याला पुरस्कार मिळाले नाही तरी चालतील परंतु कादंबरी वाचनाने एक जरी जीव आत्महत्येपासून परावर्त केला, वाचवला तरी हे कार्य जगातल्या सर्व पुरस्कार मिळाल्यापेक्षाही महान ठरेल. हेच महान कार्य वावटळ या कादंबरीने साध्य केले आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. लेखक स्वतः उच्चशिक्षित असल्यामुळे त्यांना सामाजिक जाण आणि भान आहे. समाजातल्या शैक्षणिक अवस्था, बेरोजगारांच्या समस्या, मानवी स्वभाव, चढउतार, अर्थव्यवस्था, सरकारची धोरणे या सर्वांचा सखोल अभ्यास आहे. भारतीय समाज व्यवस्थेची नाळ धार्मिकतेशी जोडलेली आहे. त्यामुळे लेखकाने कादंबरीत धार्मिक स्थळांचे उल्लेख, श्रद्धा, नवस यांनाही श्रद्धापूर्वक स्थान दिले. नव्हे तर त्याच्या नवसामुळेच सुरेशचे जीवन पालटले हेही धार्मिकतेच्या पातळीवरून शब्दांकित केले.

लेखकाने जरी धार्मिक घटनाचे महत्त्व विशद केले असले तरी त्यांनी बौद्धिकतेला तितकेच स्थान दिले. म्हणून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा उल्लेख अमेरिकन उद्योजकाच्या मुखातून तेवढ्याच ताकतीने मांडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गुणगान गातात. समाजसेवकांचे आदर्श विचार पेरतात. लेखकाने वैज्ञानिक दृष्टीकोन त्याच पद्धतीने सांभाळलेला आहे. धार्मिक,



ऐतिहासिक, स्थळांची वर्णने करत असताना आपला परिसर सर्व दूर नेऊन पोहोचवला. सोलापूर कोल्हापूर येथील वर्णने भाषेच्या माध्यमातून कादंबरी घेऊन कादंबरी बोलकी केली. पात्रांच्या तोंडी असलेले संवाद वाचकाला खिळवून ठेवत पुढे पुढे घेऊन जात राहिले. आपल्या आजूबाजूला हे सर्व घडत आहे असा भास तयार झाला. तेवढेच काय आपणही त्याचेच घटक आहोत असे कादंबरी वाचताना वाचकाला वाटत राहिले. प्रत्येकाच्या मनामध्ये प्रश्न निर्माण केले. यातून मार्ग निघायला हवे, सुरेशचे जीवन पूर्व पदावर यावे असे प्रत्येक वाचकाला वाटत राहिले. हीच सरवदे यांच्या लेखनाची यशप्राप्ती म्हणावी लागेल.

प्रत्येकाच्या जीवनात चढ-उतार असतात.असेच चढ-उतार नायक सुरेशच्या जीवनात आले.सुरेश आचाट बुद्धीचा कष्टाळू, निगर्वी व प्रामाणिक. आपल्या कामावर त्याची अफाट श्रद्धा. कोणत्याही आमिषाला बळी न पडणारा. खरे तर कंपनीची मालकीण मेहता मॅडमच त्याच्या प्रेमात पडलेली. या ठिकाणी एखाद्याने प्रॉपर्टी पाहून तिचे प्रेम स्वीकारले असते. पण कॉलेज पासून जिच्यावर जिवापाड प्रेम केले तिच्याशी सुरेशने लग्न केले. ती मात्र पैसा, प्रतिष्ठेसाठी सुरेशला सोडून अमेरिकेला जाते. एकट्या पडलेल्या सुरेशला कंपनीची मालकीण मेहता मॅडम आधार देते. प्रेम द्यायला, लग्न करायला तयार असते. पण सुरेश रामा प्रमाणे एकबाणी, एकपत्नी तो आपली पत्नी स्मिता वर अफाट प्रेम करतो. आज ना उद्या स्मिताला चूक कळेल. ती परत येईल या आशेवर जगतो.

आता विरह म्हटलं की मग नशा पाणी आलंच. अगदी त्याच न्यायाने सुरेश नशा पाणी करतो. पण वेळीच त्यातून बाहेर पडतो. स्वतःला सावरतो. आपल्या घरच्यासाठी आपल्या गावासाठी पुन्हा प्रेरणेने पेटून उठतो. या ठिकाणी सरवदे यांनी जगात चालणाऱ्या स्वार्थी प्रेमावर चपराक बसवली. हतबल होऊन आत्महत्येचा विचार करणाऱ्यांच्या समोर आदर्श घालून दिला. प्रेम करावं तर ते सुरेश प्रमाणे करावे असे वाचकाला आपसुकच वाटून जाते.' जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी,झड घालूनी प्राण देतो दीपकाचे वरी ' असे आदर्श प्रेम सुरेशने केले. 'तू मेरी नही हो सकती तो किसी की भी हो नही सकती' हा स्वार्थी विचार त्याच्या मनाला शिवला नाही. मी जगेल तर स्मितासाठी आणि मरेन तर स्मितासाठी असे म्हणून त्याने मेहता मॅडमचे प्रेम नाकारले. तुम्ही तुमच्या बरोबरीच्या मुलाशी लग्न करा असा सल्ला दिला.

'वावटळ' या कादंबरीमध्ये आदर्श विचाराचे आई-वडील साकारले. आपल्या मुलांवर आई-वडिलांचा विश्वास असल्यानंतर मुले उभी राहू शकतात याचा दाखलाही कादंबरी देते. आपल्या मुलांसाठी चार पावले मागे घेणारे पालक पंचक्रोशीत नाव असलेले वडील सर्वांना एक आदर्श घालून देतात. चांगल्या कार्यासाठी झुकले पाहिजे, माघार घेतली पाहिजे, मुलांवर विश्वास ठेवून त्यांना बळ दिले पाहिजे हा आदर्श विचाराची पेरणी करणारी ही कादंबरी आहे. छोट्या मोठ्या कारणामुळे पती-पत्नीत दुरावा निर्माण होत असतो. एकाने संयमाने घेतले तर दोन उद्ध्वस्त होणारी कुटुंबे आनंदी होऊ शकतात. याचा आदर्श मार्ग दाखवणारी ही कादंबरी आहे. सरवदे यांनी यातून भारतीय संस्कृतीचे जतन केले. वाद विवाद न करता संयमाने, डोके शांत ठेवून सर्व प्रश्न मिटू शकतात याचे समाजाला उदाहरण घालून दिले. नव्हे तर सुखी संसाराचा मार्गच सांगितला, दिशा दिली. जीवनात आलेली वावटळ शांत होऊ शकते हा जालीम मूलमंत्र दिला. लेखकाला पुढील लेखनासाठी हार्दिक शुभेच्छा!



समीक्षक
डॉ.नरसिंग अप्पासाहेब
कदम सदस्य, मराठी
विश्वकोश निर्मिती मंडळ
महाराष्ट्र राज्य,मुंबई तथा
प्रोफेसर छत्रपती शिवाजीराजे
महाविद्यालय,उदगीर जि.
लातूर.९४०४७३१०१०

पान १ वरून

हवं तर...

या भागातील नागरिकांचा कल असल्याचे प्राथमिक आकडेवारीवरून दिसून येत आहे. यावर प्रशासनाने चिंता व्यक्त केली असून, सोसायट्यांमधील मतदारांना बाहेर पडण्यासाठी विविध माध्यमांतून आवाहन केले जात आहे.

नेत्यांनी मुंबईकरांना मतदानाचे आवाहन केले आहे. ही निव्वळ सुट्टी नाही, तर शहराच्या विकासात सहभागी होण्याची संधी आहे. तक्रार करण्यापेक्षा आपला प्रतिनिधी निवडण्यासाठी घराबाहेर पडा, असे आवाहन अनेक ज्येष्ठ नेत्यांनी मतदानानंतर केले.

शाई पुसून पुन्हा...

सूचना पुन्हा एकदा सर्व संबंधिताना देण्यात आल्या आहेत. मतदाराच्या बोटाला शाई लावण्याकरिता मार्कर पेनच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाने १९ नोव्हेंबर २०११ रोजी आणि २८ नोव्हेंबर २०११ रोजी आदेश निर्गमित केले आहेत. तेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला शाई लावण्यासाठी मार्कर पेनचा वापर केला जात आहे. या आदेशानुसार मतदाराच्या बोटावर ठळकपणे उमटेल, अशा पद्धतीने मार्कर पेनने शाई लावण्यात यावी; तसेच नखावर आणि नखाच्या वरच्या बाजुला त्वचेवर तीन- चार वेळा घासून शाई लावावी, अशा सूचना यापूर्वी देखील देण्यात आल्या असून आणि त्या मार्कर पेनवरही नमूद केल्या आहेत. त्यामुळे शाई पुसण्याचा प्रयत्न करण्याचे गैरकृत्य करू नये, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.

बोगस मतदानाबाबत आतापर्यंत आमच्याकडे एक तक्रार आली आहे, त्यावर कारवाई करण्यात आली आहे. पाडू यंत्राबाबत विरोधी पक्षांनी केलेल्या आरोपांवरही निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिले असून, पाडू हे यंत्र २००४ पासून वापरात आहे, ते नवीन नाही. ते अपवादात्मक परिस्थितीत, ईव्हीएम डिस्प्ले बंद पडल्यास वापरण्यात येते. आतापर्यंत ०.५ टक्के वेळाच हे यंत्र वापरण्यात आल्याचे राज्य निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले.

राज्यात मतदानाच्या...

वाद झाला आणि वादाचे रूपांतर किरकोळ हाणामारीमध्ये झाले. अकोला महापालिकेतील प्रभाग १७ मधील भांडपुरा चौकातल्या महापालिकेच्या उर्दू कन्या शाळेच्या मतदान केंद्रावर हा प्रकार घडला आहे. या मतदान केंद्रावर लोकांची मोठी गर्दी होती. दरम्यान, पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतल्याने पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. दरम्यान पोलिसांनी मतदान केंद्राबाहेर जमलेली गर्दी पांगवली. सध्या परिस्थिती नियंत्रणात आली असून मतदान केंद्रावर पोलिसांचा मोठा बंदोबस्त वाढवला गेला आहे.

संभाजीनगरात ईव्हीएम मशिन बिघाडाचा आरोप

संभाजीनगरमध्ये मतदान प्रक्रियेदरम्यान गोंधळ उडाला आहे. संभाजीनगर शहरातील नारेगाव परिसरात मतदान यंत्रावरील बटण काम करत नसल्याने उमेदवारांनी संताप व्यक्त केला आहे. तर मतदारांच्या मोठ्या प्रमाणात या ठिकाणी रांगा लागल्या आहेत. आम्ही किती वेळ रांगेत उभे राहायचे असा प्रश्न मतदारांनी निवडणूक अधिका-यांना केला आहे. प्रभाग क्रमांक ९ मधील मतदान केंद्र क्रमांक १५ मध्ये हा सगळा प्रकार घडला आहे. दरम्यान एमआयएमचे उमेदवार काकासाहेब काकडे यांनी निवडणूक अधिका-यांना मतदान केंद्रात जाऊन जाब विचारला आहे.

पिंपरीत मतदान केंद्रावर राडा, निवडणूक अधिका-यांची गाडी रोखली

बोगस मतदानाचा आरोप करत एका महिलेने मतदान केंद्रावर चांगलाच राडा घातला आहे. तसेच राडा घातल्यानंतर तिने निवडणूक विभागाच्या अधिका-यांची गाडी देखील रोखून धरली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील 'कल्पतरू' या उच्चभ्रू लोकांच्या सोसायटीमधील मतदान केंद्रावर हा धक्कादायक प्रकार घडला आहे. मतदार यादीत नाव नाहीत, मतदार याद्या व्यवस्थित नाहीत. उमेदवाराला न विचारता ईव्हीएम मशिनवरील स्टिकर निवडणून विभागाने काढले तसेच बदलून टाकले आहेत, असा आरोप शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवाराच्या नातेवाईक विद्या जवळकर यांनी केला आहे.

या सर्व आक्षेपाविषयी विद्या जवळकर या महिलेने निवडणूक विभागाकडे तक्रार केली होती मात्र तिच्या तक्रारीची निवडणूक विभागाने हवी तशी दखल न घेतल्याने तिने मतदान केंद्रावर चक्क राडा घालून निवडणूक विभागाची गाडी रोखून धरली आहे.

नाशिक-तिरुपती...

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात ७७.४० किलोमीटरचा रिंग रोड बांधला जाणार आहे. यामुळे वाढवण-नाशिक द्रुतगती महामार्ग आणि नाशिक-चेन्नई महामार्ग जोडला जाणार आहे. हा चारपदरी मार्ग असणार आहे. यामध्ये बोगदा, दोन मोठे पूल आणि २५ लहान पुलांचा समावेश आहे.

नाशिकमधील हा रिंग रोड संपूर्ण शहराला प्रदक्षिणा घालणार आहे. यामुळे राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी महामार्ग, नाशिक-सोलापूर-अक्कलकोट आणि नाशिक-चेन्नई असे सर्व मार्ग जोडले जाणार आहेत.

निवडणूक शांततामय ,...

जानेवारी २०२६ ते २१ जानेवारी २०२६ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार आहेत. मात्र, १८ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार नाहीत. या नामनिर्देशनपत्रांची छाननी २२ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. तसेच २३, २४ आणि २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. २७ जानेवारी रोजी दुपारी ३.३० नंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे व चिन्ह वाटपाची कार्यवाही केली जाईल. ५ फ ब्रुवारी रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे, तसेच ७ फ ब्रुवारी रोजी सकाळी १० पासून मतमोजणी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली.

जिल्ह्यात एकूण ५९ जिल्हा परिषद गट आणि ११८ पंचायत समिती गण आहेत. अंतिम म तदार यादीनुसार जिल्ह्यात एकूण १४ लाख ९९ हजार १९० म तदार असून, यामध्ये ७ लाख ८६ हजार ६८३ पुरुष आणि ७ लाख १२ हजार ४९४ महिला म तदारांचा समावेश आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत मतदारांच्या संख्येत १९ हजार ९०० ने वाढ झाली आहे.

जिल्ह्यात एकूण १ हजार ७५३ मतदान केंद्रे स्थापित केली जाणार असून यामध्ये १३ महिला संचलित, ११ युवा संचलित आणि ६ दिव्यांग संचलित मतदान केंद्रे असतील. सर्व केंद्रांवर रॅम्प, व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, शेड आणि स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय असेल. या निवडणूक प्रक्रियेसाठी एकूण १० हजार ५१८ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. जिल्हा परिषद उम ेदवारासाठी ६ लाख रुपये आणि पंचायत समिती उमेदवारासाठी ४.५ लाख रुपये खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आचारसंहितेच्या अंम लबजावणीसाठी भरारी पथके व स्थिर संनियंत्रण पथके तैनात केली आहेत. सर्व मतदारांनी या लोकशाहीच्या उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी कायदा व सुव्यवस्थाविषयक तयारीच्या अनुषंगाने माहिती दिली.

याठिकाणी स्वीकारली जाणार जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक नामनिर्दे शनपत्रे

१) अहमदपूर तालुका- तहसिलदार अहमदपूर यांचे दालन, तहसिल कार्यालय, अहमदपूर

२) जळकोट तालुका- मुख्याधिकारी यांचे दालन, प्रशासकीय इमारत, जळकोट

३) उदगीर तालुका- उपविभागीय अधिकारी उदगीर यांचे दालन, महसूल भवन, छत्रपती शिवाजी महाराज चौक, उदगीर

४) देवणी तालुका- सभागृह, तहसील कार्यालय, देवणी

५) शिरूर अनंतपाळ- तहसीलदार यांचे कक्ष, तहसील कार्यालय, शिरूर अनंतपाळ

६) चाकूर तालुका- तहसील कार्यालय चाकूर येथील तहसीलदार चाकूर यांचे दालन

७) रेणापूर तालुका- तहसीलदार यांचे दालन, तहसील कार्यालय, रेणापूर

८) लातूर तालुका- तहसीलदार लातूर यांचे कोर्ट हॉल, तहसील कार्यालय, लातूर

९) औसा तालुका- कोर्ट हॉल, तहसील कार्यालय, औसा

१०) निलंगा तालुका- कार्यशाळा, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बिदर रोड, निलंगा

शेतकऱ्यांसाठी...

शेतक-यांच्या खात्यात पैसे जमा होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

पुढच्या महिन्यात म्हणजेच ५ फेब्रुवारीला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका आहेत. या निवडणुकीआधी शेतक-यांच्या खात्यात पैसे जमा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. निधी मंजूर झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतक-यांच्या खात्यात पैसे जमा केले जातील.

३५९ उमेदवारांचे..

ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांनी सकाळच्या सत्रात मतदानासाठी प्राधान्य दिले. दुपारी दीड वाजेपर्यंत ३०.७२ टक्के तर दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ४३.५८ टक्के मतदान झाले. दुपारच्या सत्रात उन्हामुळे गर्दी काहीशी कमी झाली होती. मात्र, त्यानंतर सायंकाळी मतदानाला गती मिळाली. मतदानाची वेळ संपण्यापूर्वी मतदान केंद्रांवर आलेल्या मतदारांना मतदान केंद्रात दाखल करून घेऊन मतदान करून घेण्यात आले. अनेक मतदान केंद्रांवर रात्री उशिरापर्यंत मतदान सुरू होते. सर्वच मतदान केंद्रांवर मतदारांनी रांगा लावून आपला मतदानाचा हक्क बजावला. रात्री उशिरापर्यंत मतदानाची आकडेवारी महापालिका प्रशासनाकडून उपलब्ध झाली नाही.

उद्या (शुक्रवारी) बार्शी रोडवरील शासकीय महिला तंत्रनिकेतन येथे सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार आहे. दुपारपर्यंत निकाल हाती येण्याची शक्यता असून मतदार राजा महापालिकेच्या सत्तेची चावी कोणाकडे देणार आणि महापालिकेवर कोणाचा झेंडा फडकणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मेंदूत केमिकल...

पुसण्याचा प्रयत्न केला, त्याचा हेतू गुन्हेगारी स्वरूपाचा असू शकतो. शाई पुसण्यापूर्वी बोटावर तेल लावले होते का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ज्यांना दुबार मतदान करायचे आहे, तेच अशा प्रकारे शाई पुसण्याचे प्रकार करू शकतात. त्यामुळे ज्याने शाई पुसली आहे, त्याच्यावर निवडणूक आयोगाने गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी मागणी शेलार यांनी केली आहे. रशियावरून तेल आणले आहे का, असा टोला लगावत त्यांनी ठाकरे आणि त्यांच्या समर्थकांच्या शाईबद्दल शंका उपस्थित केली.

राजकीय मेंदूत केमिकल लोचा!

शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या या आरोपाचा समाचार घेताना भाजपचे नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. ठाकरेंच्या राजकीय बुद्धीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, त्यांच्या मेंदूत 'केमिकल लोचा' झाला असल्याची बोचरी टीका शेलार यांनी केली आहे. आशिष शेलार यांनी यावेळी उद्धव ठाकरेंनी आजवर केलेल्या विविध आरोपांची जणू यादीच वाचून दाखवली. आधी त्यांनी मतचोरीचा आरोप केला, मग मतदार यादीतील नावांची चोरी झाल्याचे म्हटले. त्यानंतर दुबार मतदान, ईव्हीएम (एतच्) मशीनमधील बिघाड आणि अगदी निवडणूक अधिकाऱ्यांच्या निवडीतही चोरी झाल्याचे अजब दावे त्यांनी केले. आता या सर्व गोष्टी संपल्यावर त्यांनी थेट मतदानाच्या शाईवरच संशय व्यक्त करायला सुरुवात केली आहे, असे शेलार म्हणाले. उद्धव ठाकरेंच्या या भूमिकेला शेलार यांनी निव्वळ 'राजकीय कथानक' (डलीळींशिव छरीीरींळींश) ठरवले आहे. हे सर्व पाहता ठाकरेंच्या राजकीय मेंदूत केमिकल लोचा झाला असून ही केवळ बुद्धीतील हेराफेरी आहे, अशी टीका त्यांनी केली.

रडणाऱ्यांच्या मागे मुंबईकर जाणार नाहीत!

निवडणूक आयोगाकडे कोणतीही अधिकृत तक्रार दाखल न करता केवळ पत्रकार परिषदा घेऊन गोंधळ घालणे, हा निव्वळ निवडणूक प्रचाराचा आणि प्रसिद्धीचा भाग असल्याची टीका शेलार यांनी केली आहे. शाई पुसली जात असल्याच्या मुद्द्यावरून राज ठाकरे यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेवर शेलार यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज ठाकरेंना हा प्रश्न मतदानाच्या दिवशीच का सुचला? हे त्यांना आधी का सुचले नाही? असा थेट सवाल शेलार यांनी केला आहे. विरोधकांवर 'रडके' असल्याची बोचरी टीका करताना शेलार म्हणाले की, मुंबईचा नागरिक सुज्ञ आहे आणि तो अशा रडणाऱ्या नेत्यांच्या पाठीशी कधीही उभा राहणार नाही. तक्रार करण्याचा कायदेशीर मार्ग सोडून केवळ कॅमेऱ्यासमोर आरोप करणे हे राजकीय अपरिपक्वतेचे लक्षण आहे, असेही ते म्हणाले. विरोधकांनी रडण्याची सवय सोडावी आणि जनतेने लोकशाही बळकट करण्यासाठी मोठ्या संख्येने बाहेर पडून मतदान करावे, असे आवाहन शेलार यांनी केले. कोणत्याही अफवांना किंवा राजकीय 'इव्हेंट'ला बळी न पडता नागरिकांनी आपला हक्क बजवावा, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

निवडणूक काळात पोलीस प्रशासनाने
कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी - पुजार



धाराशिव (प्रतिनिधी) - येत्या ५ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद समित्यांच्या निवडणुकीसाठी पंचायत सार्वत्रिक मतदान होणार आहे. जिल्ह्यात या निवडणुकीदरम्यान कोणतीही अप्रिय घटना घडणार नाही, याची दक्षता घ्यावी. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी पोलीस विभागाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दि. १४ जानेवारी रोजी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक रितू खोखर, सहाय्यक जिल्हाधिकारी रवैयाह डोंगरे, जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर, संतोष राऊत, अरुणा गायकवाड, श्रीकांत पाटील, उपविभागीय अधिकारी सर्वश्री ओंकार देशमुख, दत्तू शेवाळे, गणेश शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी सर्वश्री संजय पवार, अनिल चोरमले, सुरेश राऊत, अरविंद शेलार, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक आमोद भुजबळ यांची सभागृहात तर सर्व पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक यांची ऑनलाईन उपस्थिती होती. पुढे बोलताना पुजार म्हणाले की, अनधिकृत बॅनर व जाहिरात फलक काढण्यात यावेत, शहरी भागात बॅनर लावण्यात येत असतील तर त्याची पूर्व परवानगी नगर परिषदेकडून घेण्यात यावी. निवडणूक काळात आदर्श आचार संहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

विविध राजकीय पक्षांना प्रथारासाठी वेगवेगळ्या परवानग्या घेण्याबाबतचे कळवावे, प्रत्येक मतदान केंद्राला निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस अधिकारी यांनी संयुक्तपणे भेट देऊन पाहणी करून मतदान केंद्रावरील त्रुटी दूर कराव्यात. तडीपारची प्रकरणे तातडीने सादर करून त्यावर त्वरित कारवाई करावी, असे त्यांनी सांगितले. तसेच स्थिर पथके, भरारी पथके, चित्रीकरण करणारी पथके व चित्रीकरणाची बारकाईने निरीक्षण करणाऱ्या पथकांनी प्रभावीपणे आपली कामे करावीत असे त्यांनी नमूद केले. तर मतदान केंद्रावर मोबाईल घेऊन जाण्यास प्रतिबंध आहे. ही बाब लक्षात घेऊन त्याची अमलबजावणी करावी. उशिरापर्यंत ज्या मतदान केंद्रावर मतदान होणार आहे अशा केंद्रावर पुरेसा पोलीस बंदोबस्त, प्रकाश व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असावी. दर दिवशी सायंकाळी माध्यमांच्या प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूक विषयक कामकाजाची तसेच पोलीस अधिकायांनी केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती द्यावी. ही माहिती दोघांनीही माध्यमांना नियमितपणे द्यावी. सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही आणि निवडणूक काळात कोणालाही उपोषणाला बसता येणार नाही. पोलीस बंदोबस्तासाठी आवश्यक असलेली वाहने उपलब्ध करून देण्यात येतील असे त्यांनी सांगितले. तर खोखर म्हणाल्या की, निवडणूक काळात पोलिसांकडे असलेल्या जबाबदारीची माहिती त्यांना आहे. उमेदवार व राजकीय धक्षांना निवडणुकीच्या प्रचारार्थ देण्यात येणाऱ्या सर्व परवानग्या निःपक्षपातीपणे देण्यात याव्या. आचार संहितेचे उल्लंघन करणाच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करून गुन्हे दाखल करावेत. शासकीय मालमत्तेचे विद्रुपीकरण होणार नाही याची खबरदारी घ्यावी, पोस्टर्स व बॅनर्स परवानगी घेऊनच लागले आहेत का ? याची खात्री करावी अन्यथा संबंधितांच्या विरुद्ध गुन्हे दाखल करावेत असे निर्देश त्यांनी दिले. तसेच निवडणूक काळात विविध पथके तैनात राहणार असल्याचे सांगून त्या म्हणाल्या की, प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने कराव्यात, तडीपारीची कारवाई प्राधान्याने करावी. कोणताही आरोपी किंवा संशयित व्यक्ती निवडणूक काळात काही अप्रिय घटना घडविण्याची शक्यता असल्याचे लक्षात आल्यास त्याच्यावर तातडीने कारवाई करायी. अवैध शस्त्र जप्तीची कारवाई करण्यात यावी, परवाना असलेली शस्त्रे जमा करून घ्यावी, असे त्यांनी सांगितले. तर निवासी उपजिल्हाधिकारी कड़वकर यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी असलेल्या विविध कलमांची तसेच विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती दिली. निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या तयारीची माहिती यावेळी उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांनी दिली व काही सूचना देखील त्यांनी केल्या.



नामांतर लढ्यातील लढवय्या पँथरच्या सत्काराने नामविस्तार दिन साजरा

नळदुर्ग (प्रतिनिधी) - डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा नामांतर लढा आणि लढ्यातील आठवणींना उजाळा देत शासन दरबारी १६ वर्षे संघर्ष करावा लागला. ज्या महामानवाने भारतीय संविधान तयार केले. त्या संविधान निर्मात्यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्यास महाराष्ट्र सरकार टाळाटाळ करत होते. पण पँथरच्या त्या आक्रोश आंदोलनाने अखेर नामविस्तार करण्यात आला.

या घटनेचा इतिहास असून हा संघर्ष डोळ्यासमोर ठेवून मराठवाड्यात नळदुर्ग शहर हे चळवळीचे मुख्य केंद्र समजले जायचे. नळदुर्गमध्ये इतिहास घडवणारी माणसे सुद्धा आहेत. नळदूर्ग येथे नामांतर आंदोलनातील लढवय्या पँथर ज्याने अनेक दिवस नामांतराच्या लढ्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत अंदोलने उभा केली, जेल भोगले असे क्रांतिकारक भीमसैनिक आज ही आहेत. त्यापैकी धाडसी निर्भिड भिमसैनिक रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे मराठवाडा कार्याध्यक्ष दुर्वास बनसोडे व रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे या नामांतर लढ्यातील वाटाड्यांचा समाजाच्यावतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात करण्यात आला. हा सत्कार नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे व पत्रकार मित्र अमर भाळे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पत्रकार तथा बोद्धाचार्य नामांतर लढयातील भिमसैनिक दादासाहेब बनसोडे यांनी केले प्रथमता डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान फलकाचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले यावेळी सामाजिक कार्यकर्ते योगेश सुरवसे, अतुल बनसोडे, राजरत्न बनसोडे, सोनू बनसोडे, प्रशिक बनसोडे, ऋषिकेश कांबळे, तुषार गायकवाड, सचिन वाघमारे, बिटू कांबळे, सुभाष कांबळे, दत्तात्रय कांबळे, बाबासाहेब कांबळे, राजेश बनसोडे, वैभव कांबळे, संतोष कांबळे, प्रशांत कांबळे, गट्टू बनसोडे, आदित्य राजगुरु, ओमकार साबळे, बबलू नागिले, गणेश दुरुगकर, अमोल कांबळे, अक्षय कांबळे, रितेश बनसोडे, पप्पू नागिले, शुभम बोदले आदींसह भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. आंबेडकर विद्यापीठ उपपरिसरात नामविस्तार दिन साजरा

धाराशिव (प्रतिनिधी) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन विद्यापीठ उपपरिसरात उत्साहात साजरा करण्यात आला.

धाराशिव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठ उपपरिसराचे संचालक प्रा. डॉ. रमेश चौगुले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक



प्रा. परिवर्तन जगझाप यांनी तर सूत्रसंचालन विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. गणेश शिंदे व उपस्थितांचे आभार नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. महेश्वर कळलावे यांनी मानले. प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर, इतिहास विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी नामविस्तार आणि मानवी हक्क चळवळ या विषयावर सर्व सविस्तर मार्गदर्शन केले. इतिहास हा मानवी हक्काचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ मानवी हक्कांची आहे. भारताला उज्वल शिक्षण परंपरा लाभलेली आहे. मानवी हक्काची तत्वे मुळात भारतीय ग्रंथात वर्णन केलेली आहेत.

समानता, मानवी हक्क शिक्षणातून जपले पाहिजेत. चवदार तळ्याचा सत्याग्रह, मंदिर प्रवेशाची चळवळ या मानवी हक्क विषयक चळवळी आहेत. डॉ. आंबेडकर यांचा अहिंसक क्रांतीवर विश्वास होता. साउथबरो कमिशनसमोर त्यांनी मतदानाचा अधिकार देण्याची मागणी केली. तसेच त्यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामात महत्वपूर्ण योगदान दिले. आर्थिक लोकशाही व सामाजिक लोकशाही भारतात प्रस्थापित झाल्यावर राजकीय लोकशाही योग्य प्रकारे रुजेल. शिक्षणाची दारे खुली करून देण्यात आली. लोकगीते, पोवाडे, साहित्य निर्माण झाले. डॉ. आंबेडकर यांचे नाव विद्यापीठास देऊन नामविस्तार करण्यात आला. सामाजिक परिवर्तन हि हळुहळु होणारी व चिरकाल टिकणारी गोष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यापीठ उपपरिसराचे संचालक प्रा. डॉ. रमेश चौगुले म्हणाले की, सामाजिक न्याय, समतेचा हा लढा महत्वपूर्ण आहे. सामाजिक न्यायाची चळवळ ही लोकशाही मजबूत करणारी असल्याचे त्यांनी सगितले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. या कार्यक्रमास विद्यापीठ उपपरिसरातील विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ढोकी जिल्हा परिषद गटातून
भाजपच्या पवार यांची प्रबळ दावेदारी

ढोकी (प्रतिनिधी) धाराशिव तालुक्यातील ढोकी जिल्हा परिषद गटातून आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश सचिव व ढोकी ग्रामपंचायत सदस्य तसेच भारतीय जनता पार्टीचे धाराशिव आदिवासी मोर्चाचे तालुकाध्यक्ष संजय सुरज पवार हे भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक आहेत. त्यासाठी त्यांनी पक्षश्रेष्ठीकडे उमेदवारीची मागणी केली असून या मतदारसंघावर कमळाच्या चिन्हावर त्यांनी प्रबळ दावेदारी हक्क सांगितला आहे. त्यामुळे या मतदारसंघात पवार यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली असून पक्षाने त्यांना कमळाच्या चिन्हावर उमेदवारी द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा आखाडा पेटला आहे. धाराशिव तालुक्यातील ढोकी जिल्हा परिषद गट

लढविण्यासाठी हा आदिवासी प्रवर्गातील पुरुषांसाठी राखीव आहे. या मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर निवडणूक ढोकी



ग्रामपंचायतचे सदस्य, आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश सचिव व भारतीय जनता पार्टी आदिवासी मोर्चाचे धाराशिव तालुकाध्यक्ष संजय पवार जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यांनी आदिवासी बांधवांसाठी शासनाच्या असलेल्या योजना राबविण्यासह वस्ती विकासासाठी प्रयत्न केले आहेत. ते आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे यांचे कट्टर समर्थक असून आदिवासी समाजासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले व राबवित आहेत. त्यांचे शिक्षण बारावी उत्तीर्ण असून आदिवासींचा विकास निधी त्या घटकालाच खर्च करण्यास ते संबंधित शासकीय यंत्रणेवर सातत्याने दबाव आणून त्या

योजनांची अंमलबजावणी आदिवासी भागातच करण्यास संबंधित यंत्रणा भाग पाडतात. जर भारतीय जनता पार्टीने त्यांना निवडणुकीसाठी तिकीट दिले तर ते निश्चितपणे निवडून येऊ शकतात. कारण त्यांचा जनसंपर्क देखील आदिवासी बांधवाबरोबरच इतरांशी देखील चांगल्या प्रकारचा आहे. ते सर्व धर्मीय कार्यक्रमात सक्रिय असतात. ती त्यांच्या राजकीय कार्याची जमेची बाजू असल्यामुळे त्यांनी निवडणूक लढविण्याचा निर्धार व्यक्त करून पक्षाच्या वरिष्ठ नेत्याकडे तिकीट मिळण्यासाठी फिल्डिंग लावली आहे.

संविधान उद्देशिका प्रत वाटप करून नामविस्तार वर्धापन साजरा

धाराशिव (प्रतिनिधी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्ताराच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त रामकृष्ण परमहंस महाविद्यालयसमोर विद्यार्थी संघटनेच्यावतीने नामविस्तार वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात संविधान निर्माते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मतदार जनजागरण समिती व फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या जिथे जाचाल तिथे वाचाल भारतीय संविधान या उपक्रमात भारतीय संविधान उद्देशिका विश्लेषण प्रत व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील संसदेमधील भाषण असलेले पुस्तक वाटप करण्यात आले. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सामाजिक कार्यकर्ते (वैद्यकीय) अधिक्षक सिध्दार्थ जानराव, आशाताई कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. तर मतदार जनजागरण समितीचे कार्याध्यक्ष गणेश वाघमारे यांनी भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान सभेतील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील भाषण व उद्देशिका विश्लेषण प्रत बाबत माहिती सांगितली. यावेळी प्रदिप लष्करे, रणवीर जानराव, विवेक यादव, विजय राठोड आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



देगलूरात १८ जानेवारी ला मदन देशपांडे स्मृती संगीत समारोह चे आयोजन संगीत समारोह चे १० वे वर्ष

देगलूर (प्रतिनिधी): दरवर्षी प्रमाणे यावर्षीही येथील सुफी मित्र परिवार सेवाभावी संस्थेच्या वतीने मदन देशपांडे स्मृती संगीत समरोहाचे आयोजन करण्यात आले असून यात मुंबई येथील जगप्रसिद्ध सितार वादक डॉ.स्वीकार कट्टी, तबला वादक रोहित देव, आणि तरुण बासरी वादक अनहद वारसी हे आपली कला सादर करणार आहेत. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.विजयमाला बालाजी टेकाळे , तहसीलदार भरत सूर्यवंशी आणि ज्येष्ठ सांगीतज्ञ पंडित बाबुराव उप्पलवार गुरुजी यांच्या हस्ते होणार आहे. यावर्षी स्व.मदन देशपांडे स्मृती समारोहाचे १० वे वर्ष आहे. संगीत प्रेमी साठी दरवर्षी स्व. मदन देशपांडे स्मृती समारोहाच्या माध्यमातून शास्त्रीय संगीताची मेजवानी उपलब्ध करून दिली जाते.तरी या संगीत समारोहासाठी देगलूर च्या रसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन सुफी मित्र परिवार देगलूर चे ऐनोद्दीन वारसी,सौ.शबाना हाशमी यांनी केले आहे.

सलमान शेख बेंबळी जि. प. गटातून निवडणुकीसाठी सज्ज

धाराशिव (प्रतिनिधी) - जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची तयारी सुरू झाली असून प्रत्येक पक्षाच्या नेते मंडळींनी आपली फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे.

मात्र, बेंबळी जिल्हा परिषद गटासाठी काँग्रेसचे एकनिष्ठ व युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सलमान सत्तार शेख हे काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढविण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यांचे या मतदार संघातील प्रत्येक गावातील सर्व समाज घटकांतील मतदारांशी पहिल्यापासूनच चांगले संबंध आहेत. कारण त्यांचे वडील पंचायत समितीचे उपसभापती होते. तेव्हापासून ते आजपर्यंत त्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळवून देण्यासह सार्वजनिक विकास कामे मोठ्या प्रमाणात केलेली आहेत.

त्यामुळे त्यांनी या भागातून काँग्रेस पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढविण्याची तयारी केली आहे. विशेष म्हणजे बेंबळी जिल्हा परिषद गटाचे तिकीट शेख यांनाच द्यावे, अशी मागणी पक्षातील कार्यकर्त्या बरोबरच सर्वसामान्य जनतेतून होऊ लागली आहे. त्यांनी हा मतदार संघ मागील दोन महिन्यापासूनच पिंजून काढला असून सर्व समाज घटकातील नागरिकांशी संवाद साधक त्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यावर भर दिला आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा फड रंगू लागला आहे. त्यामुळे सर्वच पक्ष आघाडी व युती करण्यासाठी हालचाली करीत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, जनसेवेची आवड असलेल्या सलमान सत्तार शेख यांनी या भागात आपला जनसंपर्क वाढविला असून प्रत्येक गावात त्यांना मानणारा वर्ग मोठा आहे. शिवाय त्यांचे वडील सत्तार शेख हे पंचायत समितीचे सभापती होते. त्या काळात या भागात वैयक्तिक लाभाच्या योजना व सार्वजनिक विकासाच्या योजना राबवून या परिसराचा विकासात्मक कायापालट केलेला आहे. तर त्यांच्या आई फातिमा सत्तार शेख या बेंबळी गावच्या विद्यमान सरपंच आहेत. त्यांनी बेंबळे गावात वेगवेगळ्या प्रकारच्या विकासात्मक योजना राबविल्या व राबवीत आहेत. शेख परिवार गेल्या अनेक वर्षापासून फक्त काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ म्हणून कार्यरत आहे. मागील पंचवार्षिक निवडणुकीमध्ये त्यांच्या आई फातिमा यांनी बेंबळी जिल्हा परिषद गटातून काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती. तर सलमान शेख यांनी यापूर्वी युवक काँग्रेसचे तुळजापूर तालुका उपाध्यक्ष म्हणून दोन वेळेस यशस्वी काम पाहिलेले आहे. विशेष म्हणजे सलमान शेख यांना राजकीय क्षेत्रा बरोबरच सामाजिक कामांची आवड पहिल्यापासूनच आहे. त्यांनी संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, श्रावण बाळ योजना, घरकुल योजना व वैयक्तिक योजना या माध्यमातून लाभार्थ्यांना लाभ मिळवून दिला आहे. तर अनेक गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी देखील प्रयत्न केलेले आहेत. तसेच धाराशिव-उजणी हा मार्ग करण्यासाठी त्यांनी आंदोलन करून सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यामुळे ते काम तडीस लावण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सामाजिक सलोखा राखावा यासाठी हिंदू-मुस्लिम या दोन्ही समाजामध्ये सातत्याने सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा दांडगा जनसंपर्क असल्यामुळे या निवडणुकीत त्यांना या मतदार संघातून काँग्रेस पक्षाने तिकीट द्यावे अशी मागणी कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिक करीत आहेत. लोकांच्या उपयोगी पडणारा नेता अशी ओळख असल्यामुळे ते सहजासहजी निवडून येणार असल्याच्या प्रतिक्रिया मतदारातून व्यक्त होत आहेत.

धाराशिव नगर परिषद गटनेतेपदी सिद्धार्थ बनसोडे यांची निवड



धाराशिव (प्रतिनिधी) -धाराशिव नगर परिषदेच्या काँग्रेस पक्षाच्या गटनेतेपदी नगरसेवक सिद्धार्थ अंगुल बनसोडे यांची निवड दि. १४ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आली.

काँग्रेस पक्षाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत बनसोडे यांची निवड करण्यात आली. बनसोडे हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावान नगरसेवक असून काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष धीरज पाटील, माजी अध्यक्ष विश्वासराव शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, प्रदेश सचिव डॉ. स्मिता शहापूरकर, जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष खलील सय्यद, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, डी. सी.सी. बँकेचे संचालक मेहबूब पाशा पटेल, बाजार समितीचे संचालक उमेश राजेनिंबाळकर, ज्येष्ठ नेते सदर उस्मान कुरेशी, ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष धनंजय राऊत, माजी नगरसेवक मुनीर कुरेशी, नगरसेवक अक्षय जोगदंड, नगरसेविका उज्मासबा अजहर पठाण, अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्ष आयुब पठाण, मुहीब शेख, अशोक बनसोडे, सरफराज काझी, मैनुद्दीन पठाण, महिला जिल्हा कार्याध्यक्ष तनुजा हेड्डा, मनिषा वाघमारे, प्रभाकर लोंढे, मिलिंद गोवर्धन, मौलाना शौकत सय्यद, अजहर पठाण, कफील सय्यद, आरेफ मुलाणी, अभिमान पेठे, सचिन धाकतोडे, सौरभगायकवाड यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

'हिंद-दी-चादर' श्री गुरू तेग बहादूर साहिबजींचा गौरवशाली इतिहास

विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत आजपासून विविध उपक्रम



लातूर, दि. १५ : धर्म, सत्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी बलिदान देणारे 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त त्यांचा गौरवशाली इतिहास, त्यांच्या त्यागाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न शिक्षण विभागामार्फत केला जाणार आहे. यानिमित्त आजपासून जिल्ह्यात शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

'प्रभात फेरी'च्या माध्यमातून शिक्षण विभाग करत आहे. प्रभात फेरी गुरूवार पासून (दि.१६ ते २३ जानेवारी) जिल्हाभरातील शाळांमधून निघणार आहे. नांदेड येथील आसर्जन परिसरातील (मोदी ग्राउंड) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घराघरात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजींचा इतिहास पोहचविण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत २५ जानेवारीपर्यंत दरम्यान चित्रकला, गायन, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा होतील. जिल्हास्तरावर विजेत्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव नांदेड येथे आयोजित मुख्य सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येईल. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊनही सन्मानित केले जाईल.

hinddichadar ३५० या ऐतिहासिक सोहळ्याची व्याप्ती वाढविण्यासाठी डिजिटल माध्यमांचाही प्रभावी वापर करण्यात येत आहे. नागरिकांनी आणि तरुणाईने hinddichadar350 या हॅशटॅगचा वापर करून कार्यक्रमाशी संबंधित पोस्ट, फोटो आणि रिल्स सोशल मीडियावर शेअर करावेत, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

मतदान कार्डच्या गठ्ठ्यासह बोगस मतदार पकडला!

अहिल्यानगर : अहिल्यानगर महापालिका निवडणुकीत बोगस मतदारांना पकडण्यात आले आहे. केडगाव आणि सावेडी उपनगरात हा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, बोगस मतदारांना पकडून उमेदवारांनी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. या बोगस मतदारांकडे मोठ्याप्रमाणात बोगस मतदान कार्डचा गठ्ठा सापडला आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. या बोगस मतदारांमागील सूत्रधार कोण याचा शोध घ्या? तसेच बोगस मतदान करायचे असेल, तर मतदान प्रक्रिया बंद करा, अशी घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. त्यामुळे काही काळ मतदान प्रक्रियेत गोंधळ उडाला. अहिल्यानगर शहरातील सावेडी उपनगरात प्रभाग क्रमांक तीनमधील आनंद विद्यालयात मतदान केंद्रावर निवडणूक कार्डासह दोन बोगस मतदारांना पकडण्यात आले.

शारदा स्कूलमध्ये जिजाऊ, विवेकानंदांना अभिवादन



लातूर, - येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंती यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थाध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात झालेल्या कार्यक्रमात प्राचार्य लक्ष्मण पुरी यांनी महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी शाळेतील कृष्णा आडगावकर, कृष्णा सांगळे, आराध्या अनमूलवाड, श्रावणी आर्य, दूर्वा बाळे, दिव्या गाडे, हर्षदा गाडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. रोहित जाधव, मेघा शिंदे, शीतल नडगिरे व महेश सोनवणे या शिक्षकांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी शाळेच्या समन्वयिका मानसी पाटील, अश्विनी पवार, वर्षा कांबळे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन रोहिणी कदम यांनी केले.

धुळ्यात ईव्हीएम मशिन फोडली



धुळे : धुळे महापालिका निवडणुकीत राडा झाला आहे. मतदान केंद्रात घुसून, ईव्हीएम मशिन फोडण्यात आले. भाजपच्या कार्यकर्त्यांनी हा प्रताप केल्याचा गंभीर आरोप एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने केला. या प्रकारामुळे मतदान प्रक्रिया काही काळ ठप्प पडली होती.

पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त वाढवला होता. त्यामुळे छावणीचे स्वरूप आले होते. मतदानाच्या आदल्या दिवसापासून धुळे शहरातील वातावरण तापले असून, भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये राडे होत आहेत. यातच ईव्हीएम मशिन फोडण्यात आल्याची भर पडली. त्यामुळे मतदानावेळी तणावाचे वातावरण होते.

धुळे महापालिका निवडणुकीत तणावपूर्ण वातावरणात मतदान सुरू आहे. यातच प्रभाग क्रमांक ८ मध्ये ईव्हीएम मशिनची तोडफोड करण्यात आली. त्यामुळे मतदान केंद्रावर एकच गोंधळ उडाला. भाजपच्या कार्यकर्त्यांनी ही ईव्हीएम मशिनची तोडफोड केल्याचा आरोप एकनाथ शिंदे शिवसेना कार्यकर्त्यांनी केला आहे.

एकनाथ शिंदे शिवसेनेच्या आमदार मंजुळा गावित यांनी मतदान केंद्रावर धाव घेतली. पोलिसांनी त्यांना जाब विचारला. बंदोबस्त असताना, ते इथं आले कसे? ईव्हीएम मशिन फोडेपर्यंत बंदोबस्तावरील पोलिस काय करत होते, अशी प्रश्नांची सरबत्ती त्यांनी केली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करत नोंद घेतली आहे.

मतदानाच्या काही दिवसांपासून शहरातील वातावरण दूषित केले जात आहे. एकनाथ शिंदे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना टार्गेट केले जात आहे. मतदानाच्या दिवशी हा प्रकार म्हणजे, दादागिरी अन् दहशत माजवण्याचा आहे,' असा आरोप आमदार मंजुळा गावित यांनी केला.

माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याकडून प्रभाग क्र.०३,०४,१६,१८ मधील बुथ केंद्राची पाहणी



लातूर – लातूर शहर महानगरपालिकेसाठी मतदान प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रभाग क्र.०३,०४,१६ आणि १८ मधील ट्विंकल लँड इंग्लिश स्कूल, मजगे नगर लातूर बुथ ३, राजर्षी शाहू ज्युनिअर कॉलेज महात्मा बसवेश्वर चौक बुथ २, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय बूथ ३, संत पाचलेगावकर महाराज उच्च प्राथमिक विद्यालय बूथ २ आणि मिनार उर्दू प्राथमिक विद्यालय बुथ २ या बूथ केंद्राची भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी पाहणी करून दिवसभरातील मतदान प्रक्रिया व एकूण मतदानाचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष प्रतिभाताई पाटील कव्हेकर, कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, अदिती पाटील कव्हेकर, ऋषिकेश राजे, सत्यवती संतराम चेवले, फिरोज पटेल, जाफर पटेल, रंजीत पाटील कव्हेकर, विश्वजीत पाटील कव्हेकर, अप्पासाहेब पाटील, रोहित पाटील, बालाजी शेळके, इस्माईल बागवान, किशोरदादा घार, शिवशरण थांबा, गोविंद सोदले, सुभाष आप्पा सुलगुडले, भागवतराव संपत्ते, गोपाळ वांगे, सूर्यकांतराव शेळके, गिरीश पाटील, मंगेश बिराजदार, मुन्ना हाश्मी,अशोक पाटील,रशीद भाई शेख, सुनील सौदागर, दिगंबर शेटे, राजकुमार शेटे, दत्ता चेवले, संजय गिर, शशिकांत हांडे, बाळासाहेब शिंदे, शितल कुलकर्णी, आफरीन खान, आशिफ पटेल, हरून पटेल, कमलाकर कदम,विजय जाकते, लाला पाटील, अमर जाधव, दस्तगीर शेख, अनंत माने, महादू पिटले, बसवराज सुलगुडले, महादेव गायकवाड, नेताजी मस्के, सचिन घार, अमर सारगे, प्रभाकर कदम, आशिष बोंडगे, सागर घोडके, शिवाल पाटील, वैभव भोसले, सहदेव बिराजदार, कार्तीक चाटे, संतोष जाधव, राजेसाहेब देशमख, उध्दव जाधव, धनंजय बाचपल्ले, गणेश नांगराळे, ॲड.किशोर शिंदे, आयुष गंगणे,मुक्तेश्वर मिटकरी, मंथन मिटकरी, अमृत पाटील, किरण पाटील, अंकीत बाहेती, दिलीप धोत्रे,द्याडे अप्पा,सोमनाथ भरडे,वैजनाथ उकीरडे, बाबासाहेब देशमुख, अमोल मुंडे, राजाभाऊ मुळे, भरत जाधव शेठ, विष्णू घार,हर्ष गंगणे, संतोष शेटे, यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुण्यात शिवसेनेचा मतदान केंद्राबाहेर गदारोळ; बोगस मतदार असल्याचे म्हणत राडा

पुणे : पुणे महानगरपालिका निवडणुकीदरम्यान प्रभाग क्रमांक ४१ मध्ये बोगस मतदान झाल्याचा आरोप करत शिवसेनेचे उमेदवार नाना भानगिरे यांनी काही मतदारांना मतदान केंद्रातून ताब्यात घेतल्याची घटना घडली. या घटनेमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या या प्रकाराने राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नाना भानगिरे यांनी काही मतदार बोगस असल्याचा संशय व्यक्त करत त्यांना थांबवले. संबंधित मतदारांनी मतदान केल्याचा आरोप करण्यात आला आणि त्यानंतर त्यांना चौकशीसाठी थेट काळेपडळ पोलीस स्टेशन येथे नेण्यात आले. मात्र, पोलिस चौकशीत एक वेगळेच चित्र समोर आले. संबंधित मतदारांची नावे अधिकृत मतदान यादीत असल्याचे प्राथमिक तपासणीत आढळून आले असून, याच आधारे त्यांनी मतदान केल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना काळेपडळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणात निवडणूक अधिकाऱ्यांकडून बोगस मतदान झाल्याची कोणतीही अधिकृत तक्रार अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सध्या कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. त्यांनी पुढे सांगितले की, संबंधित मतदारांची ओळखपत्रे, विशेषतः आधार कार्ड व इतर कागदपत्रांची सखोल तपासणी केली जाणार आहे.

पोलीस प्रशासनाने सावध भूमिका घेतली असली, तरी राजकीय आरोप-प्रत्यारोपांना मात्र उधाण आले आहे. शिवसेनेकडून बोगस मतदानाचा गंभीर आरोप केला जात असताना, प्रशासन मात्र नियमांच्या चौकटीतच कारवाई होईल, अशी भूमिका घेत आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून बोगस मतदान झाल्याची अधिकृत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेसाठी ४० टक्के मतदान

पुणे : प्रतिनिधी– पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत कमी अधिक प्रमाणात मतदारांचा उत्साह दिसत होता पहिल्या चार तासात मतदानाची टक्केवारी कमी असल्याचे पाहायला मिळाले. दुपारनंतर मतदानाचे प्रमाण वाढले असल्याचे दिसून आले.

शुक्रवारी सकाळी मतमोजणीस सुरुवात होऊन संध्याकाळपर्यंत निकाल जाहीर होण्याचा अंदाज आहे. दुपारी साडे तीन पर्यंत पुणे महानगर पालिकेसाठी ३६ टक्के आणि पिंपरी चिंचवड महानगर पालिकेसाठी ४० टक्के मतदान झाले आहे.

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी सकाळच्या पहिल्या दोन तासात ६.३७ टक्के तर साडेअकरा पर्यत १४.९२ टक्के मतदान तर दुपारी दीड पर्यंत २६.२८ टक्के मतदान झाले होते. तसेच दुपारी साडे तीन पर्यंत ३६.९५ टक्के मतदान झाले होते.सकाळी केंद्रीय सहकार



राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ राज्याचे उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील तसेच राज्यमंत्री माधुरी मिसाळ,विधान परिषद उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे यांनी मतदानाचा हक्क बजावला. सकाळच्या काही तासात शहराच्या मध्यवस्तीमधील मतदान केंद्रावर मतदारांचा उत्साह दिसत होता अनेक भागात रांगा लागलेल्या पहावयास मिळाले तर उपनगरात मतदारांचे प्रमाण कमी दिसत होते.

पिंपरी चिंचवड महानगर पालिका निवडणुकीसाठी दुपारी दीड पर्यंत २८.१५ टक्के तर दुपारी साडेतीन पर्यत ४०.५ टक्के मतदान झाले असल्याची माहिती मिळाली आहे.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी तब्बल ९ वर्षांनंतर निवडणूक होत आहे एकूण १२८ पैकी १२६ जागांसाठी मतदान पार पडले. एकूण ६९७ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.मतदार संख्या १७ लाख १६ हजार ८९१ इतकी आहे.

काही मतदान केंद्रातील ई व्ही एम यंत्रामध्ये बिघाड झाल्याची तक्रार करण्यात आली.त्यामुळे अशा मतदान केंद्रावर अतिरिक्त यंत्राची उपलब्धता करण्यात आली.

पत्रकारांची लेखणी ही तलवारीपेक्षा अधिक धारदार असते: ना.बाबासाहेब पाटील यांचे प्रतिपादन

चाकूर प्रतिनिधी– समाजाच्या जडणघडणीत पत्रकारांची भूमिका फार महत्वाची असून खऱ्या अर्थाने पत्रकारांच्या लेखणीतूनच समाजाचे प्रतिबिंब उमटते.पत्रकार हा प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यातील दुवा असून पत्रकारांची लेखणी ही तलवारीपेक्षा अधिक धारदार असते असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी केले. ते चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाच्या सभागृहात चाकूर सिटी प्रेस क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सर्जेराव शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष करीमसाहेब गुळवे, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिपाळे, पोलीस निरीक्षक बालाजी भंडे, जेष्ठ पत्रकार अनिल वाडकर, कामगार नेते पप्पूभाई शेख उपस्थित होते.



पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की पत्रकारिता ही समाजाला न्याय देण्यासाठी असुन सामाजिक बांधिलकी समजून पत्रकारिता करणे आवश्यक असते,पुरस्कार छोटा आहे किंवा किती मोठा आहे हे महत्वाचे नसते तर त्या पुरस्काराच्या पाठीमागील भावना महत्वाच्या असतात.सिटी प्रेस क्लब चाकूरने पुरस्कारासाठी अत्यंत योग्य पत्रकारांची निवड केली आहे.अशाच पद्धतीने त्यांनी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनाही सन्मानित करावे अशी अपेक्षा सहकार मंत्री नामदार पाटील यांनी व्यक्त केली.

या शानदार समारंभात ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते जेष्ठ पत्रकार संजय जेवरीकर यांना स्व.नागोराव संभाजी शिंदे यांच्या स्मरणार्थ पत्रकार अ. ना.शिंदे यांच्यावतीने 'राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार',मुंबई येथील वरिष्ठ सहाय्यक संचालक,जनसंपर्क विभागातील काशीबाई थोरात यांना स्व.काशीबाई बळीराम सोनटक्के यांच्या स्मरणार्थ जेष्ठ स्वातंत्र सैनिक बळीरामजी सोनटक्के व पत्रकार संगमेश्वर जनगावे यांच्या वतीने 'राज्यस्तरीय पत्रकार भूषण पुरस्कार' तर ,दैनिक सामनाचे लातूर जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर यांना कालवश मालनबाई सोपानराव कांबळे व कालवश सोपान काशीराम कांबळे यांच्या स्मरणार्थ पत्रकार मधुकर कांबळे यांच्या वतीने 'राज्यस्तरीय मायदादा वृत्तरत्न पुरस्कार' देऊन सन्मानीत करण्यात आले.

याप्रसंगी पुरस्कार प्राप्त सन्मानार्थी पत्रकार संजय जेवरीकर, काशीबाई थोरात, अभय मिरजकर यांनी सत्काराला देत यथोचीत मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.सर्जेराव शिंदे यांनी केला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात या पुरस्काराची भूमिका सिटी प्रेस क्लबचे सचिव मधुकर कांबळे यांनी विशद केली.अध्यक्ष प्रा. अ. ना. शिंदे यांनी पुरस्कार प्राप्त सन्मानार्थी यांच्या कार्याच्या आढावा घेत परिचय करून दिला. दरम्यान कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ,युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद आणि दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास व्ही. एस. पँथर्सचे जिल्हाध्यक्ष शरद किनीकर,दशरथ अर्बन बँकेचे चेअरमन दिलीप पाटील, राष्ट्रवादीचे युवक तालुकाध्यक्ष संदीप शेटे,प्रा. डॉ. बी. डी. पवार यांच्यासह विविध वर्तमान पत्राचे प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार संगमेश्वर जनगावे, सलीम तांबोळी, सुनील भोसले, के. आर. वाघमारे, विजय शिंदे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सिटी प्रेस क्लबचे सल्लागार प्रा. डॉ.राजेश तगडपल्लेवार यांनी केले तर आभारप्रदर्शन सलीम तांबोळी यांनी मानले.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट साठी एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील डॉ. पुजा आष्टुरे यांची निवड

लातूर, दि. १५ – येथील एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील एम.पी.टी.एच. मस्सक्युलो स्केलेटल विषयातील व्दितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. पुजा रविंद्र आष्टुरे यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (MUHS) यांच्या शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ (STRG) या संशोधन कार्यासाठी नुकतीच निवड झाली आहे. राज्यातील शासकीय व निमशासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतून सदरील संशोधनासाठी ही निवड झाली आहे.

गेल्या एप्रिल २०२५ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वतीने शॉर्ट टर्म रिसर्च ग्रँट २०२४-२५ (STRG) या संशोधन कार्यासाठी राज्यभरातील बी.पी.टी.एच. व एम.पी.टी.एच. फिजिओथेरपी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव मागवले होते. त्यामध्ये एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी संशोधन कार्यासाठी प्रस्ताव पाठवले होते. यामध्ये २५ पैकी एम.पी.टी.एच. व्दितीय वर्षातील विद्यार्थीनी डॉ. पुजा आष्टुरे या विद्यार्थीनीच्या प्रस्तावाची १२ जानेवारी रोजी निवड करण्यात आली आहे.

या मध्ये गुडघ्याच्या ऑस्टिओआर्थ्राइटिस असलेल्या रुग्णांमध्ये फिजिओथेरपीस्टव्दारे हालचाल व स्वत;चा हालचालीस तुलनात्मक प्रभावीपणा: एक यादृच्छिक नियंत्रित चाचणी या विषयावर डॉ. पुजा आष्टुरे संशोधन करणार आहेत.

येत्या डिसेंबर २०२६ पर्यंत सदरील संशोधन पुर्ण करुन ते महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहे. या संशोधन कार्यासाठी एमयुएचएसकडून नऊ हजार आठशे एवढे विद्यावेतन मिळणार आहे.

या निवडीबद्दल डॉ. पुजा आष्टुरे यांचे एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य तथा मार्गदर्शक डॉ. सुभाष खत्री, विभाग प्रमुख डॉ. गौरव भटनागर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांतून अभिनंदन होत आहे.